# 9. सरावासाठी अधिक प्रश्न

**(1)** एका प्रदर्शनात महिला बचत गटाने लावलेल्या दुकानातून मीनाने खालील वस्तू खरेदी केल्या.

**(i)** **2** साड्या प्रत्येकी **425** रु.

**(ii)** **4** कुर्ती प्रत्येकी **320** रु.

या खरेदीवर शेकडा **10** रिबेट मिळाले, तर रिबेटची एकूण रक्कम किती ? मीनाला किती रक्कम द्यावी लागली ?

उकल : **2** साड्यांची किंमत = **2 × 425 = 850** रु.

**4** कुर्तींची किंमत = **4 × 320 = 1280** रु.

∴ खरेदी केलेल्या मालाची एकूण किंमत = **850 + 1280**

= **2130** रु.

खरेदीवर मिळणारे रिबेट = शेकडा **10**

∴ मिळणारे एकूण रिबेट = $2130 \times \frac{10}{100} = 213$ रु.

∴ मीनाला द्यावी लागणारी रक्कम = एकूण किंमत – रिबेट

= **2130 – 213**

= **1917**

∴ (i) रिबेटची एकूण रक्कम : **213** रु.

(ii) मीनाला **1917** रु. द्यावे लागतील.

**(2)** ग्रामोद्योग मंडळाच्या एका दुकानातून रसिक भाईंनी खालील वस्तू खरेदी केल्या.

**(i) 12** गांधी टोप्या प्रत्येकी **15** रु.

**(ii) 3** टॉवेल प्रत्येकी **110** रु.

**(iii) 2** धोतर प्रत्येकी **370** रु.

या खरेदीवर शेकडा **12** रिबेट देण्यात आले तर रसिक भाईंना या वस्तू किती रुपयांना मिळाल्या ?

उकल : 12 गांधी टोप्यांची किंमत = $12 \times 15 = 180$ रु.

3 टॉवेलांची किंमत = $3 \times 370 = 740$ रु.

2 धोतरांची किंमत = $2 \times 110 = 330$ रु.

∴ खरेदी केलेल्या मालाची एकूण किंमत

= $180 + 740 + 330 = 1250$ रु.

खरेदीवर मिळणारे रिबेट = शेकडा 12

∴ मिळणारे एकूण रिबेट = $1250 \times \frac{12}{100}$

$$= \frac{1250 \times 12}{100}$$

$$= \frac{15000}{100}$$

$$= 150$$

∴ रसिक भाईंना द्यावी लागणारी एकूण रक्कम = खरेदी केलेल्या मालाची एकूण रक्कम − एकूण रिबेट

= $1250 - 150 = 1100$

∴ रसिक भाईंना त्या वस्तू 1100 रुपयांना मिळाल्या.

**(3)** खादी भांडारातून मोहितने खालील वस्तू खरेदी केल्या.

**(i)** 2 लाकडी फूलदाण्या प्रत्येकी 160 रु. ( यांवर शेकडा 15 प्रमाणे रिबेट दिले )

**(ii)** 4 कलाकुसर केलेल्या बांबूच्या वस्तू प्रत्येकी 210 रु.

( यांवर शेकडा 18 प्रमाणे रिबेट दिले )

**(iii)** 3 मूर्त्या प्रत्येकी 275 रु. ( यांवर शेकडा 20 प्रमाणे रिबेट दिले )

तर त्यावर एकूण किती रिबेट मिळाले आणि मोहितला सर्व वस्तू घेण्यासाठी किती रक्कम द्यावी लागली.

उकल : 2 लाकडी फूलदाण्यांची किंमत = $2 \times 160 = 320$ रु.

4 बांबूच्या वस्तूंची किंमत = $4 \times 210 = 840$ रु.

3 मूर्त्यांची किंमत = $3 \times 275 = 825$ रु.

$\therefore$ खरेदी केलेल्या एकूण वस्तूंची किंमत = $320 + 840 + 825 = 1985$ रु.

**(i)** फूलदाण्यांवर मिळणारे रिबेट = शेकडा 15

$\therefore 320 \times \frac{15}{100} = \frac{4800}{100} = 48$ रु.

**(ii)** बांबूच्या वस्तूवर मिळणारे रिबेट = शेकडा 18

$\therefore 840 \times \frac{18}{100} = \frac{15120}{100} = 151.20$ रु.

**(iii)** मूर्त्यांवर मिळणारे रिबेट = शेकडा 20

$\therefore 825 \times \frac{20}{100} = \frac{16500}{100} = 165$ रु.

$\therefore$ सर्व वस्तूंवर मिळणारे एकूण रिबेट = $48 + 151.20 + 165$

$= 364.20$ रु.

मोहितला द्यावी लागणारी एकूण रक्कम = खरेदी केलेल्या एकूण वस्तूंची किंमत − एकूण रिबेट

$= 1985 - 364.20 = 1620.80$ रु.

$\therefore$ मोहितला सर्व वस्तू घेण्यासाठी एकूण 1620.80 रु. द्यावे लागतील.

**(4) गांधीजयंती निमित्त खादी कापडावर 16% रिबेट जाहीर केले. बंडोपंतांनी खालीलप्रमाणे माल खरेदी केला.**

**(i) 3 चादरी प्रत्येकी 475 रु.**

**(ii) 4 पंचे प्रत्येकी 75 रु.**

**(iii)15 हातरुमाल प्रत्येकी 23 रु.**

**तर या व्यवहारात बंडोपंतांना किती रिबेट मिळाले ? सर्व वस्तू किती किंमतीस मिळाल्या ?**

उकल : 3 चादरींची किंमत $= 3 \times 475 = 1425$ रु.

4 पंच्यांची किंमत $= 4 \times 75 = 300$ रु.

15 हातरुमालांची किंमत $= 15 \times 23 = 345$ रु.

$\therefore$ खरेदी केलेल्या एकूण वस्तूंची किंमत $= 1425 + 300 + 345$

$= 2070$ रु.

खरेदीवर मिळणारे रिबेट = शेकडा 16

$$= 2070 \times \frac{16}{100}$$

$$= \frac{33120}{100}$$

$= 331.20$ रु.

बंडोपंतांना द्यावी लागणारी रक्कम = खरेदी केलेल्या एकूण वस्तूंची किंमत −रिबेट

$= 2070 - 331.20 = 1738.80$ रु.

$\therefore$ (i) बंडोपंतांना या व्यवहारात 331.20 रु. रिबेट मिळाले.

**(ii)** बंडोपंतांना सर्व वस्तू **1738.80** रुपयांना मिळाल्या.

**(5) आनंदरावांनी प्रत्येकी 120 रु. किंमतीचे 2 टॉवेल , प्रत्येकी 310 रु. किंमतीचे 3 शर्ट्स आणि प्रत्येकी 420 रु. किंमतीचे 3 पायजामे विकत घेतले त्यासाठी त्यांनी दुकानदाराला 1944 रु. दिले. तर त्यांना किती रक्कम रिबेट मिळाली ? रिबेटचा शेकडा दर किती होता ?**

उकल : 2 टॉवेलांची किंमत $= 2 \times 120 = 240$ रु.

3 शर्ट्सची किंमत $= 3 \times 310 = 930$ रु.

3 पायजाम्यांची किंमत $= 3 \times 420 = 1260$ रु.

∴ खरेदी केलेल्या एकूण वस्तूंची किंमत $= 240 + 930 + 1260 = 2430$ रु.

खरेदीवर मिळणारे रिबेट = खरेदी केलेल्या एकूण वस्तूंची किंमत – दुकानदाराला दिलेली रक्कम $= 2430 - 1944 = 486$ रु.

$$\text{शेकडा सूट} = \frac{\text{रिबेट}}{\text{छापील किंमत}} \times 100$$

$$= \frac{486}{2430} \times 100$$

$$= 20$$

∴ **(i)** रिबेटची रक्कम **486** रु. मिळाली.

**(ii)** रिबेटचा शेकडा दर **20** होता.

**(6)** सोपानरावांनी **50** क्विंटल तूरडाळ प्रति क्विंटल **3500** रु. या दराने विकली. दलालाने शेकडा **2.5** प्रमाणे कमिशन घेतले. तर सोपानरावांना तूरडाळ विक्रीचे एकूण किती रुपये मिळतील ?

उकल : सोपानरावांनी विकलेल्या तूरडाळीची किंमत = $50 \times 3500$ =1,75,000 रु.

कमिशनचा दर = शेकडा 2.5

∴ कमिशन = विक्री किंमत – कमिशनचा दर शे.

$$= 175000 \times \frac{2.5}{100}$$

$$= 1750 \times 2.5$$

= 4375 रु.

सोपानरावांना तूरडाळ विक्रीतून मिळणारी रक्कम = 175000 – 4375

= 170625 रु.

∴ सोपानरावांना तूरडाळ विक्रीचे एकूण 1,70,625 रु. मिळतील.

**(7)** एका मेंढपाळाने प्रत्येकी **6500** रु. प्रमाणे **15** शेळ्या विकत घेतल्या. या व्यवहारात दलालाला शेकडा **3** दराने कमिशन मिळाले. तर मेंढपाळाने किती रुपये कमिशन दिले ? मेंढपाळाने किती रुपयांत शेळ्या खरेदी केल्या ?

उकल : 15 शेळ्यांची किंमत = $15 \times 6500 = 97500$ रु.

कमिशनचा दर = शेकडा 3

∴ कमिशन = किंमत × कमिशनचा शेकडा दर

$$= 97500 \times \frac{3}{100}$$

$$= 975 \times 3$$

= 2925 रु.

मेंढपाळाने दिलेली रक्कम = शेळ्यांची किंमत + कमिशन

= 97500 + 2925

= 100425 रु.

∴ (i) मेंढपाळाने दलालाला 2925 रु. कमिशन दिले.

(ii) मेंढपाळाने 1,00,425 रुपयांत शेळ्या खरेदी केल्या.

**(8) मेघनाने 85,00,000 रुपयांना दलालामार्फत स्वत:चा बंगला विकला. दलालाने दोघांकडून शेकडा 2.5 प्रमाणे कमिशन घेतले. तर दलालास एकूण किती कमिशन मिळाले ? मेघनाला बंगला विकून किती रुपये मिळाले ?**

उकल : बंगल्याची किंमत = 85,00,000

कमिशनचा दर = शेकडा 2.5

∴ कमिशन = बंगल्याची किंमत × कमिशनचा शेकडा दर

$$= 8500000 \times \frac{2.5}{100}$$

$$= 8500000 \times \frac{25}{100}$$

$$= 8500 \times 25$$

= 212500 रु.

दोघांकडून मिळणारे कमिशन = 212500 + 212500 = 425000 रु.

बंगला विकून मिळणारी रक्कम = 8500000 – 212500 = 8287500 रु.

∴ (i) दलालास 4,25,000 रु. कमिशन मिळाले.

(ii) मेघनाला बंगला विकून 82,87,500 रु. मिळाले.

**(9)** एका दुकानदाराला खालीलप्रमाणे कमिशन मिळते. **50,000** रु. विक्रीपर्यंत **1.5 %** , **50,000** रु.च्या वरील परंतु **75,000** रु. विक्रीपर्यंत **2.5 %** आणि **75,000** रु. च्या वरील विक्रीवर **3.5 %** कमिशन मिळते. एका महिन्यात **85,000** रु. विक्री झाली तर त्या दुकानदाराला एकूण किती कमिशन मिळेल ?

उकल : पहिली विक्री = 50,000 रु.

50,000 रु. च्या विक्रीपर्यंतचा कमिशनचा दर = 1.5%

50,000 रु. च्या विक्रीपर्यंत मिळालेले कमिशन = पहिली विक्री × पहिल्या विक्रीपर्यंतचा कमिशनचा दर

$$= 50000 \times \frac{1.5}{100}$$

$$= 50000 \times \frac{15}{1000}$$

$$= 50 \times 15$$

= 750 रु.

दुसरी विक्री = 75000 – 50000 = 25000 रु.

50,000 रु. ते 75000 रु. विक्रीपर्यंतचा कमिशनचा दर = 2.5%

∴ 50000 रु. ते 75000 रु. विक्रीपर्यंत मिळालेले कमिशन

= दुसरी विक्री × दुसऱ्या विक्रीपर्यंतचा कमिशनचा दर

$$= 25000 \times \frac{2.5}{100}$$

$$= 25000 \times \frac{25}{1000}$$

= 625 रु.

तिसरी विक्री = 85,000 रु. – 75000 रु. = 10,000 रु.

**75000** रु. च्या वरील विक्रीवरचा कमिशनचा दर = **3.5%**

∴ **75000** रु. च्या वरील विक्रीवर मिळालेले कमिशन =

तिसरी विक्री × तिसऱ्या विक्रीचा कमिशनचा दर

$= 10000 \times \frac{3.5}{100}$

$= 10000 \times \frac{35}{1000}$

= **350** रु.

एकूण विक्रीवर मिळालेले कमिशन = पहिल्या विक्रीचे कमिशन +

दुसऱ्या विक्रीचे कमिशन + तिसऱ्या विक्रीचे कमिशन

= **750 + 625 + 350 = 1725** रु.

∴ दुकानदाराला विक्रीवर मिळालेले कमिशन = **1725** रु.

**(10)** एका वस्तूची छापील किंमत **2650** रु. आहे. दुकानदाराने ग्राहकास छापील किंमतीवर प्रथम **15%** सूट व नंतर शेकडा **10** याप्रमाणे सूट देऊन विकली. तर त्या वस्तूची विक्री किंमत किती ?

उकल : वस्तूची छापील किंमत = **2650** रु.

दुकानदाराने ग्राहकास प्रथम **15%** सूट दिली.

∴ वस्तूवर मिळालेली पहिली सूट $= 2650 \times \frac{15}{100}$

$= \frac{265 \times 15}{10}$

= **397.50** रु.

वस्तूची कमी झालेली किंमत = **2650 – 397.50 = 2252.50** रु.

दुसरी सूट = शेकडा 10

वस्तूवर मिळालेली दुसरी सूट = $2252.50 \times \frac{10}{100} = 225.25$

∴ वस्तूच्या विक्रीची किंमत = वस्तूची कमी झालेली किंमत – वस्तूवर मिळालेली दुसरी सूट

∴ वस्तूच्या विक्रीची किंमत = 2252.50 – 225.25 = 2027.25

∴ त्या वस्तूची विक्री किंमत 2027.25 रु. आहे.

**(11)** मीराने एका कंपनीचा फ्रीज ऑनलाईन मागविला. फ्रीजची छापील किंमत 27200 रु. आहे. ऑफरमध्ये तिला फ्रीजवर 12% सूट मिळाली तर मीराला किती रुपयांना फ्रीज मिळेल ?

उकल : फ्रीजची छापील किंमत = 27,200 रु.

ऑफरमध्ये मिळालेली सूट = 12%

∴ फ्रीजवर मिळालेली सूट = $27200 \times \frac{12}{100}$

= $272 \times 12$

= 3264 रु.

फ्रीजची विक्री किंमत = छापील किंमत – सूट

= 27200 – 3264

= 23936 रु.

∴ मीराला 23936 रुपयांना फ्रीज मिळेल.

(12) एक दुकानदार त्याच्या उत्पन्नाच्या 25% बचत करतो. दुकानदाराला त्याने केलेल्या विक्रीच्या 12% कमिशन मिळते. जर एका महिन्यात त्याने 3,20,000 रु. ची विक्री केली तर त्या महिन्यामध्ये त्याची किती रुपयांची बचत झाली ?

उकल : एकूण विक्री = 3,20,000 रु.

कमिशनचा दर = 12%

विक्रीवरील कमिशन = $320000 \times \frac{12}{100}$

= 38400 रु.

विक्रीवरील कमिशन = उत्पन्न

बचत = उत्पन्नाच्या 25%

∴ बचत = $38400 \times \frac{25}{100}$

= $384 \times 25$

= 9600

∴ दुकानदाराची त्या महिन्यामध्ये 9600 रुपयांची बचत झाली.

(13) हातमाग मंडळाच्या एका भांडारातून शारदाताईंनी पुढीलप्रमाणे वस्तू खरेदी केल्या:

4 पडदे प्रत्येकी 185 रु. , 5 शोभेच्या वस्तू प्रत्येकी 135 रु. या खरेदीवर 20% रिबेट मिळाले तर रिबेटची एकूण रक्कम किती ?

खालील कृती पूर्ण करा.

4 पडद्यांची किंमत = 4 × ☐ = ☐ रु.

5 शोभेच्या वस्तूंची किंमत = 5 × ☐ = ☐ रु.

∴ खरेदी केलेल्या वस्तूंची एकूण किंमत = ☐ + ☐ = ☐ रु.

रिबेटचा दर = ☐

∴ मिळालेले रिबेट = शेकडा रिबेट × ☐

$= \frac{20}{100} \times$ ☐ = ☐ रु.

∴ शारदाताईंना मिळालेली रिबेटची रक्कम = ☐ रु.

उकल : 4 पडद्यांची किंमत = 4 × 185 = 740 रु.

5 शोभेच्या वस्तूंची किंमत = 5 × 135 = 675 रु.

∴ खरेदी केलेल्या वस्तूंची एकूण किंमत = 740 + 675

= 1415 रु.

रिबेटचा दर = 20%

∴ मिळालेले रिबेट = शेकडा रिबेट × एकूण किंमत

$= \frac{20}{100} \times 1415 = 283$ रु.

∴ शारदाताईंना मिळालेली रिबेटची रक्कम = 283 रु.

**(14)** बाजीरावांनी दलालामार्फत एक म्हैस खरेदी केली. तिची किंमत **22500** रु. ठरवली. त्यांनी शेकडा **2** दराने कमिशन दिले तर या व्यवहारात त्यांना किती रक्कम द्यावी लागली ?

खालील कृती पूर्ण करा.

म्हैशीची किंमत = $\square$ रु.

कमिशनचा दर = $\square$

∴ दिलेले कमिशन = शेकडा कमिशन × $\square$

$$= \frac{2}{100} \times \square = \square$$

∴ बाजीरावांना द्यावी लागलेली रक्कम = कमिशन + $\square$

$$= \square + \square$$

$$= \square$$

∴ बाजीरावांना म्हैस खरेदी करण्यासाठी द्यावी लागलेली रक्कम = $\square$ रु.

उकल : म्हैशीची किंमत = $\boxed{22500}$ रु.

कमिशनचा दर = $\boxed{\text{शेकडा } 2}$

∴ दिलेले कमिशन = शेकडा कमिशन × $\boxed{\text{म्हैशीची किंमत}}$

$$= \frac{2}{100} \times \boxed{22500} = \boxed{450 \text{ रु.}}$$

∴ बाजीरावांना द्यावी लागलेली रक्कम = कमिशन × $\boxed{\text{ठरवलेली किंमत}}$

$$= \boxed{450} + \boxed{22500}$$

$$= \boxed{22950 \text{ रु.}}$$

∴ बाजीरावांना म्हैस खरेदी करण्यासाठी द्यावी लागलेली रक्कम = $\boxed{22950 \text{ रु.}}$

(15) एका औषध विक्रेत्याने 2880 रु. छापील किंमतींची औषधे 2160 रुपयांस विकत घेतली. तर विक्रेत्यास किती टक्के सूट मिळाली.

खालील कृती पूर्ण करा.

औषध विक्रेत्यास मिळालेली सूट $= \square - \square$

$= \square$ रु.

शेकडा सूट $x$ मानू.

2880 रु. छापील किंमतीवरील सूट $\square$ रु.

100 रु. छापील किंमतीवरील सूट $\square$ रु.

$\therefore \frac{2880}{100} = \frac{\square}{\square}$

$\therefore 2880 \times \square = 100 \times \square$

$\therefore \square = \frac{100 \times \square}{\square} = \square$

$\therefore$ औषध विक्रेत्याला मिळालेली शेकडा सूट $= \square$

उकल : औषध विक्रेत्यास मिळालेली सूट $= \boxed{2880} - \boxed{2160}$

$= \boxed{720}$ रु.

शेकडा सूट $x$ मानू.

2880 रु. छापील किंमतीवरील सूट $\boxed{720}$ रु.

100 रु. छापील किंमतीवरील सूट $\boxed{x}$ रु.

$\therefore \frac{2880}{100} = \frac{\boxed{720}}{\boxed{x}}$

$\therefore 2880 \times \boxed{x} = 100 \times \boxed{720}$

$\therefore \boxed{x} = \dfrac{100 \times \boxed{720}}{\boxed{2880}} = \boxed{25}$

∴ औषध विक्रेत्याला मिळालेली शेकडा सूट = $\boxed{25}$

**(16) खालील सारणी पूर्ण करा.**

| अ.नं. | छापील किंमत (रुपये) | शेकडा सूट | विक्री किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| (1) | 33000 | ........ | 29040 |
| (2) | 2200 | 15 | .......... |
| (3) | 1200 | ........ | 900 |
| (4) | ........ | 20 | 1360 |

उकल : (1) छापील किंमत = 33000 रु , विक्री किंमत = 29040 रु.

शेकडा सूट = ?

सूट = छापील किंमत − विक्री किंमत

= 33000 – 29040

= 3960 रु.

$$\text{शेकडा सूट} = \frac{\text{सूट}}{\text{छापील किंमत}} \times 100$$

$$= \frac{3960}{33000} \times 100 = \frac{396}{33} = 12$$

∴ शेकडा सूट = 12

(2) छापील किंमत = 2200 रु., शेकडा सूट = 15, विक्री किंमत = ?

$$\text{सूट} = \text{छापील किंमत} \times \frac{\text{शेकडा सूट}}{100}$$

$$= 2200 \times \frac{15}{100}$$

$$= 22 \times 15$$

$$= 330$$

विक्री किंमत = छापील किंमत – सूट

$$= 2200 - 330$$

∴ विक्री किंमत = 1870 रु.

(3) छापील किंमत = 1200 रु., विक्री किंमत = 900 रु.,

शेकडा सूट = ?

सूट = छापील किंमत – विक्री किंमत

$$= 1200 - 900$$

= 300 रु.

$$\text{शेकडा सूट} = \frac{\text{सूट}}{\text{छापील किंमत}} \times 100$$

$$= \frac{300}{1200} \times 100$$

$$= \frac{3}{12} \times 100$$

$= 0.25 \times 100 = 25$

∴ शेकडा सूट = 25

(4) शेकडा सूट = 20 , विक्री किंमत = 1360 रु. ,

छापील किंमत = ?

छापील किंमत 100 रु. आहे असे मानू.

∴ विक्री किंमत = छापील किंमत – शेकडा सूट

= 100 – 20

= 80

विक्री किंमत 80 तेव्हा छापील किंमत 100

विक्री किंमत 1360 तेव्हा छापील किंमत $x$ मानू.

$$\therefore \frac{80}{100} = \frac{1360}{x}$$

$$\therefore x = \frac{1360 \times 100}{80}$$

$$= \frac{13600}{8}$$

$$= 1700$$

∴ छापील किंमत = 1700 रु.

दिलेली सारणी :

| अ. नं. | छापील किंमत (रुपये) | शेकडा सूट | विक्री किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| (1) | 33000 | 12 | 29040 |
| (2) | 2200 | 15 | 1870 |
| (3) | 1200 | 25 | 900 |
| (4) | 1700 | 20 | 1360 |

**(17)** खालील प्रश्न सोडवा.

**(1)** एका रेडिओची किंमत **100** रु. आहे. दुकानदाराने **6** रेडिओ शेकडा **15** सूट देऊन विकले तर एकूण सूट किती दिली **?** रेडिओची विक्री किंमत किती **?**

उकल : रेडिओची छापील किंमत = **100** रु.

∴ **6** रेडिओंची छापील किंमत = **6** × **100** = **600** रु.

शेकडा **15** प्रमाणे छापील किंमतीवर मिळणारी सूट = छापील किंमत × शेकडा सूट

$$= 600 \times \frac{15}{100} = 90$$

विक्री किंमत = छापील किंमत − सूट

= **600 – 90 = 510**

∴ **6** रेडिओंची विक्री किंमत **510** रु. आहे.

**(2) एका लॅपटॉपची किंमत 40,000 रु. असून तो गिऱ्हाइकास 36,200 रुपयांना विकला तर गिऱ्हाइकास शेकडा किती सूट मिळाली ?**

उकल : लॅपटॉपची छापील किंमत = 40,000 रु.

लॅपटॉपची विक्री किंमत = 36200 रु.

सूट = लॅपटॉपची छापील किंमत − लॅपटॉपची विक्री किंमत

= 40000 − 36200 = 3800 रु.

$$\therefore \text{शेकडा सूट} = \frac{\text{सूट}}{\text{छापील किंमत}} \times 100$$

$$= \frac{3800}{40000} \times 100 = \frac{38}{4} = 9.5$$

∴ गिऱ्हाइकास लॅपटॉपच्या खरेदीवर शेकडा 9.5 सूट मिळाली.

**(3) एका फूड प्रोसेसरची विक्री किंमत 4250 रु. आहे. दुकानदाराने शेकडा 15 सूट दिली तर त्या फूड प्रोसेसरची छापील किंमत किती ?**

उकल : शेकडा सूट = 15

∴ छापील किंमत 100 रु. आहे असे मानू.

∴ छापील किंमत 100 रु. तेव्हा सूट 15 रु.

∴ छापील किंमत 100 रु. तेव्हा विक्री किंमत = 100 – 15 = 85

∴ जेव्हा विक्री किंमत 85 रु. तेव्हा छापील किंमत 100 रु.

जेव्हा विक्री किंमत 4250 तेव्हा छापील किंमत $x$ रु. मानू.

$$\therefore \frac{85}{100} = \frac{4250}{x}$$

$\therefore \quad x = \frac{4250 \times 100}{85}$

$= \frac{850 \times 100}{17}$........ (5 ने भागून)

$\therefore \quad x = 5000$

∴ फूड प्रोसेसरची छापील किंमत 5000 रु. होती.

**(4) त्रिमूर्ती स्टोअर्सने प्रवासी बॅगांवर शेकडा 25 या दराने सूट जाहीर केली तर 1540 रु. छापील किंमतीची बॅग सूजितला किती रुपयाला मिळेल ?**

उकल : सूट = शेकडा 25

प्रवासी बॅगची छापील किंमत = 1540 रु.

$\frac{\text{सूट}}{\text{छापील किंमत}}$ हे गुणोत्तर काढू.

प्रवासी बॅगवर $x$ रुपये सूट मिळते असे मानू.

$\therefore \frac{x}{1540} = \frac{25}{100}$

$\therefore \quad x = \frac{25 \times 1540}{100}$

$= \frac{25 \times 154}{10}$

= 385 रु.

∴ एकूण सूट 385 रु. आहे.

विक्री किंमत = छापील किंमत – सूट

$= 1540 - 385$

$= 1155$

∴ सूजितला प्रवासी बॅग **1155** रुपयाला मिळेल.

**(5)** एका अडत्याला **25,000** रुपयाच्या विक्रीवर शेकडा **6** दराने कमिशन मिळाले तर त्याला किती कमिशन मिळाले ?

उकल : अडत्याने केलेली विक्री = **25,000** रु.

कमिशनचा दर = शेकडा **6**

विक्रीवर मिळालेले कमिशन = अडत्याने केलेली विक्री × कमिशनचा दर

$$= 25000 \times \frac{6}{100}$$

$$= 250 \times 6$$

$$= 1500$$

∴ अडत्याला **1500** रु. कमिशन मिळाले.

**(6)** एका सेवाग्राम खादी भांडारातून खरेदी केलेल्या वस्तूंची छापील किंमत **2160** रु. आहे. भांडाराने एकूण **280.80** रुपये रिबेट दिले. तर रिबेटचा दर किती ?

उकल : वस्तूंची छापील किंमत = **2160** रु.

एकूण रिबेट = **280.80**

$$\text{शेकडा सूट} = \frac{\text{एकूण रिबेट}}{\text{वस्तूंची छापील किंमत}} \times 100$$

$$= \frac{280.80}{2160} \times 100$$

$$= \frac{28080}{2160}$$

$$= \frac{2808}{216}$$

$$= \frac{468}{36}$$

$$= \frac{78}{6} = 13$$

∴ रिबेटचा दर 13 % आहे.

**(7) एका बेडशीटची छापील किंमत 500 रु. आहे. एक दुकानदार या किंमतीवर शेकडा 8 दराने सूट देतो. त्याला प्रत्यक्ष विक्रीच्या शेकडा 15 दराने कमिशन मिळते, तर दुकानदाराला किती रुपये कमिशन मिळते ?**

उकल : बेडशीटची छापील किंमत = 500 रु.

सूट = शेकडा 8

बेडशीटवर मिळालेली सूट = बेडशीटची छापील किंमत × शेकडा सूट

$$= 500 \times \frac{8}{100}$$

$$= 5 \times 8$$

$$= 40$$

प्रत्यक्ष विक्री किंमत = 500 – 40 = 460

कमिशनचा दर = शेकडा 15

मिळालेले कमिशन = शेकडा कमिशन × प्रत्यक्ष विक्री किंमत

$$= \frac{15}{100} \times 460$$

$$= \frac{6900}{100}$$

$$= 69$$

∴ दुकानदाराला 69 रु. कमिशन मिळते.

**(8) शामरावांनी एक भूखंड दलालामार्फत 4525250 रुपयांना संपतरावांना विकला. दलालाने दोघांकडून शेकडा 2 दराने दलाली घेतली तर दलालास एकूण किती दलाली मिळेल ?**

उकल : भूखंडाची किंमत = 4525250 रु.

दलालीचा दर = शेकडा 2

∴ दलाली $= 4525250 \times \frac{2}{100}$

$$= \frac{9050500}{100}$$

$$= 90505$$

दलालाने दोघांकडून दलाली घेतली.

∴ एकूण दलाली = 90505 + 90505 = 181010

∴ दलालास एकूण मिळालेली दलाली = 1,81,010 रु.

**(18) खालील विधाने चूक की बरोबर ते लिहा.**

**(1) दुकानदार विक्री किंमतीवर सूट देतात.**

उत्तर : चूक, दुकानदार छापील किंमतीवर सूट देतात.

**(2)** सूट देऊन उरलेली किंमत ही विक्री किंमत असते.

उत्तर : बरोबर

**(3)** सुटीचा दर दशमानात देतात.

उत्तर : चूक, सुटीचा दर शतमानात म्हणजेच शेकडेवारीत देतात.

**(4)** मालाचा खप वाढवण्यासाठी सूट देतात.

उत्तर : बरोबर

**(5)** कमिशन शेकडेवारीत देण्यात येते.

उत्तर : बरोबर

**(6)** वस्तूंवर आकारण्यात आलेले कमिशनचे दर समान असतात.

उत्तर : चूक, आकारण्यात आलेले कमिशनचे दर वस्तूंनुसार वेगवेगळे असतात.

**(7)** अडत ज्याचा माल विकतो त्याच्याकडून किंवा जो माल खरेदी करतो त्याच्याकडूनच मिळते.

उत्तर : चूक, अडत ज्याचा माल विकतो त्याच्याकडून किंवा जो माल खरेदी करतो त्याच्याकडून किंवा दोघांकडूनही मिळते.

**(8)** रिबेट म्हणजे एक प्रकारची सूटच असते.

उत्तर : बरोबर

**(9)** विशिष्ट अटीनुसार मान्यताप्राप्त संस्था किंवा शासन यांच्याकडून कमिशन दिले जाते.

उत्तर : चूक, विशिष्ट अटीनुसार मान्यताप्राप्त संस्था किंवा शासन यांच्याकडून रिबेट दिली जाते.

**(10)** रोख विक्री वाढवण्यासाठी दुकानदार सूट देतात.

उत्तर : बरोबर

**(11)** सूट दिल्यामुळे वस्तूची छापील किंमत वाढते.

उत्तर : चूक, सूट दिल्यामुळे वस्तूची छापील किंमत कमी होते.

**(12)** रिबेटची रक्कम व सूट म्हणून मिळणारी रक्कम एकच असते.

उत्तर : बरोबर

**(19)** खालील जोड्या जुळवा.

| गट 'अ' | गट 'ब' |
|---|---|
| (1) सूट | (*a*) $\dfrac{\text{कमिशन}}{\text{विक्री किंमत}} \times 100$ |
| (2) कमिशन | (b) $\dfrac{\text{सूट}}{\text{छापील किंमत}} \times 100$ |

**(3)** शेकडा सूट — **(c)** छापील किंमत − विक्री किंमत

**(4)** शेकडा कमिशन — **(d)** $\dfrac{\text{विक्री किंमत} \times \text{शेकडा कमिशन}}{100}$

उत्तर : **(1)** सूट — **(c)** छापील किंमत − विक्री किंमत

**(2)** कमिशन — **(d)** $\dfrac{\text{विक्री किंमत} \times \text{शेकडा कमिशन}}{100}$

**(3)** शेकडा सूट — **(c)** $\dfrac{\text{सूट}}{\text{छापील किंमत}} \times 100$

**(4)** शेकडा कमिशन — **(d)** $\dfrac{\text{कमिशन}}{\text{विक्री किंमत}} \times 100$

*****